महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा. सं/ जनसंपर्क/ प्रेस नोट/ ३२

## महानिर्मितीच्या कारागीर "क" पदासाठी लेखी परीक्षा आता २० सप्टेंबर, २००९ रोजी

महानिर्मितीतर्फे नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, पुणे आणि मुंबई अशा एकूण सहा ठिकाणी कारागीर "क" (Artisan "C") पदासाठी लेखी परीक्षा आता दि. २० सप्टेंबर, २००९ रोजी सकाळी एकाच वेळी घेण्यात येणार आहे. यापूर्वीची दि. १६ ऑगस्ट, २००९ रोजी आयोजित केलेली सदर परीक्षा तत्कालिन परिस्थितीतील स्वाईन फ्लुच्या संसर्गाचा धोका लक्षात घेता पुढे ढकलण्यात आली होती.

राज्यातील वीज उत्पादनाच्या क्षेत्रातील अग्रणी असलेल्या महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती (महानिर्मिती) कंपनीने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील २७ विविध प्रकारच्या ट्रेडस्‌करिता एकूण १०७६ कारागीर "क" (Artisan "C") पदांसाठी अर्ज मागविले होते त्याला भरघोस प्रतिसाद लाभला आणि राज्यभरातून जवळपास ३५ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत.

सदर परीक्षेसाठी परीक्षार्थींनी दि. २० सप्टेंबर, २००९ रोजी आपापल्या परीक्षा केंद्रावर सकाळी ठिक ९.३० वाजता हजर राहावे. या परीक्षेला बसलेल्या पात्र परीक्षार्थींना प्रवेश पत्र पोस्टाद्वारे पाठविण्यात आली आहेत. तरी अधिक माहितीकरिता या परीक्षार्थींनी तसेच ज्यांना प्रवेशपत्र मिळाले नाही अशा परीक्षार्थींनी महानिर्मितीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावरुन आवश्यक ती सर्व माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे सूचित करण्यात येत आहे.

---

दिनांक : १५/०९/२००९.

प्रति,

**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**